G.M.C.H. DHARASHIV
Outward No. 125
Date 29/06/2026

# जाहिरात

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव या संस्थेतील एम.बी.बी.एस.च्या किमान २०० किंवा त्यापेक्षा जास्त मुला/मुलींकरिता वसतीगृहाच्या वापरासाठी इमारत शासन मान्यतेच्या अधिन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुल्यांकनानुसार भाडे तत्वावर घेणे आहे. सदर इमारत भाडयाने घेण्यासाठी खालील अटींची पुर्तता होण्याची आवश्यकता आहे.

१. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव जिल्हा स्त्री रुग्णालय परिसर, धाराशिव पासुन ५ कि.मी. च्या आतील अंतरावर असणे आवश्यक आहे.
२. सदर इमारतीत किमान २०० किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थी राहतील असे प्रावधान असणे आवश्यक आहे, तसेच प्रत्येक रुम/ब्लॉकमध्ये स्वतंत्र प्रसाधन गृह असणे आवश्यक आहे.
३. उद्‌वाहन व सौरउर्जा व्यवस्था असलेल्या इमारतीना प्राधान्य देण्यात येईल.
४. सदर इमारतीमध्ये मुला-मुलींना ये जा करण्यासाठी स्वतंत्र प्रवेशव्दार असावे. तसेच इमारतीमध्ये पार्कींग, मुबलक पाणीपुरवठा,मुबलक सुर्यप्रकाश तसेच खेळती हवा असणे आवश्यक आहे.
५. सदर इमारतीत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांची पुर्तता करण्याजोगे कक्ष उपलब्ध असणे आवश्यक आहे.

तरी इच्छुक व्यक्ती/संस्थांनी इमारती संबंधी मालकी हक्क सर्व कागदपत्रे, बांधकाम परवाना, बांधकामाच्या नकाशासह (पाणीपटटी, विजदेयक व इतर कर अदा केल्याच्या पावत्या सोबत जोडण्यात याव्या) ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून कार्यालयीन कामाचे १० दिवसांच्या आत प्रत्यक्ष किंवा **deangmcosmanabad@gmail.com** या ईमेलवर अर्ज सादर करावा.

टिप: - अर्ज स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीतांकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

**(डॉ.शैलेंद्र द. चौहान),**
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव

G.M.C.H. DHARASHIV
Outward No. 1216
Date 29 / 06 / 2026

## महाविद्यालय व वसतीगृहाकरीता इमारत भाडेतत्वावर घेण्यासाठी जाहिरात

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता महाविद्यालय/मुलांचे व मुलींचे वसतीगृहासाठी इमारत भाडेतत्वावर घेणेबाबत**

**संस्थेचे नाव:- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक | ०१ /०७/२०२६ |

**(डॉ.शैलेंद्र द. चौहान),**
**अधिष्ठाता**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**धाराशिव**